**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

**दिनांक – २८/०९/२०१८** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **शुक्रवार** दिनांक **२८/०९/२०१८** रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा.अपर्णा निलेश डोके
५. मा.संजय मल्हारराव वाबळे

या शिवाय मा.चितळे – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड मनपा ३६ वा वर्धापनदिन २०१८ अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.३) प्रभाग क्र.३२ नवी सांगवी येथील बॅडमिंटन हॉलचे देखभालीसाठी मुदतवाढ मिळणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) सभा आयोजनाबाबत- मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २४/०८/२०१८ व १४/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १४/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४७ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २८/०९/२०१८ विभाग – क्रीडा
सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३३१/२०१८, दि.०१/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाची पोलिस वसाहत व्यायामशाळा, कृष्णानगर, चिखली ही कै.गजानन म्हेत्रे प्रतिष्ठाण, म्हेत्रेवाडी चिखली या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – ०२
दिनांक – २८/०९/२०१८
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपा ३६ वा वर्धापनदिन २०१८ अनुषंगाने विविध स्पर्धेतील विजेत्या /उपविजेत्या खेळाडूंना बक्षिस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, ट्रॉफीज, स्मृतीचिन्हे, कॅप खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धा प्रसंगी अधिकारी, पाहुणे, कर्मचारी यांना चहापान व अल्पोपहार, क्रिकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन, क्रीकेट स्पर्धेत सहभागी (महिला व पुरुष) खेळाडूंसाठी टी शर्ट, बॅट बॉल खरेदी इ.कामी प्रस्तावात नमुद प्रमाणे अंदाजे र.रु.५,२३,७७६/- (अक्षरी र.रु.पाच लाख तेवीस हजार, सातशे शहात्तर फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व स्पर्धेतील विजेत्या /उपविजेत्या खेळाडूंना बक्षिस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, ट्रॉफीज, स्मृतीचिन्हे, कॅप खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य क्रीकेट स्पर्धेत सहभागी (महिला व पुरुष) खेळाडूंसाठी टी शर्ट, बॅट बॉल इ. ची खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदरचा खर्च क्रीडानिधी मनपातर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा क्रीडा, कला, साहित्य या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – ०३
दिनांक – २८/०९/२०१८
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३२ नवी सांगवी येथील बॅडमिंटन हॉल हा राजश्री छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक, सामाजिक वैद्यकीय प्रतिष्ठान, नवी सांगवी, पुणे २७ यांच्याकडे सन २०१७ पासून भाडे

तत्वावर देखभाल करत असून त्यांस पाच वर्षाची मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक – ०४

दिनांक – २८/०९/२०१८

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या शुक्रवारी दुपारी ३.०० वाजता आयोजित करणेत येणारी पाक्षिक सभा यापुढे प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६४६/२०१८
दिनांक : २९/०९/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.